# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १८/१०/२०२४

घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| **1.** | पो स्टे खोलापुरी गेट **229/2024**<br>**कलम 305(अ),331(4)**<br>**भारतीय न्यायसंहीता 2023 बीएनएस** | व्यंकटेश टाउनशिप भातकुली रोड अमरावती | घटना ता.वेळ<br>**17/10/24 चे**<br>**22/00वा ते 18/10/2024 चे07/00 वा .दरम्याण**<br>दाखल ता.वेळ<br>**18/10/24 चे 12/49 वा** | संजय विठ्ठलराव वानखडे वय **51** वर्ष रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याचे नवीन घरबांधकाम सुरु असुन नमुद गॅलाँस कंपनीचे<br>**1) मिक्सर कि.3800/-2) 9 बाय 9 शावर कि.1050/- 3)प्लश कॉंक 1200/- 4)शावर नळ 2 नग कि.800/- 5) बेसीन नळ 2 नग कि.800/- 6)फिलर कॉंक 2 नग 1300/- 7)किचन नळ 2 नग कि.1700/-8)एक्सटेंन्शन निप्पल एक इंच 6 नग कि.360/-9) )एक्सटेंन्शन निप्पल दिड इंच 6 नग 180/- 10) टेप्लॉंन टेप 8 नग कि.150/- 11)स्टील प्लेट 15 नग कि.150/- 12) अँक्टर ओ बोल्ट 1 कि.70/- एस एकुण 11570/-रुपयाचा माल कोणीतरी अज्ञातत चोराने चोरुन नेला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |

घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| | पो.स्टे. राजापेठ अप क्र. ५९२/२४ कलम ३०५(c) बि. एन. एस | साईनगर येथील काळबांडे ज्वेलर्स दुकानासमोर अमरावती | दि. १७/१०/२४ चे दुपारी ०४.००वा. ते ०६.०० वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ<br><br>दि. १८/१०/२४ चे ११.४७ वा | एक पिडीत महीला | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हि हर्षराज येथुन राजकमल पर्यत ऑटोरिक्षाने आली व साईनगर येथे जाण्याकरीता बडनेराच्या ऑटोमध्ये बसली. फि. ला साईनगर येथे ज्वेलर्स यांच्याकडे १)१५ ग्रॅम सोन्याची बोरमाळ कि.अं.७५,००० रू.<br><br>२)१५ ग्रॅम सोन्याचा गोफ कि.अं.९०,००० रू.<br><br>३)३ ग्रॅम सोन्याची अंगठी कि.अं. १८,००० रू.<br><br>४)१ ग्रॅम सोन्याची अंगठी कि.अं.६००० रू. असा एकुण १,८९,००० रू. चे जुने सोने मोडुन नवीन सोने बनविण्याकरीता पांढरी डब्बीमध्ये रूमालात बांधुन पर्स मध्ये ठेवुन ऑटोमध्ये बसली होती. साईनगर येथे ऑटोमधुन उतरून ज्वेलर्स यांच्याकडे गेली असता पर्स मध्ये ठेवलेले सोने मिळुन आले नाही. फिर्यादी घबरल्याने त्यांनी त्यांचे पतीला फोन करून सांगीतले शोध घेतला असता मिळुन आले नाही. ते कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. म्हणुन आज रोजी पो.स्टे. ला येवुन रिपोर्ट दिला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

इतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **पो स्टे बडनेरा अप क्र ६३५/२४ कलम १४२ मपोका** | **मरीमाता मंदीरजवळ मातापैल जु व बडनेरा** | **दि.१८/१०/२०२४ चे ००/३० वा दरम्यान<br><br>दाखल ता वेळ- दि.१८/१०/२०२४ चे ०३/०० वा** | **सरतर्फे सपोउपनी प्रमोद गुडधे ब न २७७ पो स्टे बडनेरा अम शहर** | **आकाश उर्फे कटटु श ामला कैथवास वय-३२वषे रा- मातापैल जु व बडनेरा** | **हकीकत अश ाप्रकारे आहे की, फि व स्टाप व पो नि सा आदेश ाने पो सटे हददीत पेट्रोलींग करीत असतांना सदर आरोपी इसम हा मपो उप आ/परी-१/तडीपार/१९०९/२०२२ दि.०९/११/२०२२ अन्वये दोन वर्षा करीता तडीपार आदेश पारीत करण्यात आलेला असतांना सुध्दा सदर आरोपी हा मरीमाता मंदीरजवळ मातापैल जु व बडनेरा येथे मिळुन आला सदर इमसाचे दोन वर्षा करीता तडीपार इसल्याने त्यास अमरावती जिल्हाबाहेर सोडले असतांना निर्गमीत आदेश ाचे उल लघंन करीत काही वाजवी कारण नसतांना शहरामध्ये संचार करीत असतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले आहे नमुद आरोपीच कृत्य हे कल १४२ मपोका प्रमोण हेत असल्याने त्य ाचे विरुध्द कायदेशीर फि आहे. सरतर्फे सपोउपनी प्रमोद गुडधे ब न २७७ पो स्टे बडनेरा अम शहर** |
| 1 | नागपुरी गेट अम शहर अप क ३८०/२०२४ क ४/२५ भारतीय हत्यारकायदा सहकलम १३५ महाराष्टपोलीसकायदाअन्वये | श्रहेमत नगर चमडा गोडावुन अमरावती शहर | घटना ता १७/१०/२४ चे २२/३०ते २३/२० वा<br>दाखल ता १८/१०/२०२४ चे ००/४५ वा | पो हे कॉ शिवनाथ मदनराव आंधळे ब न ४९४ पो स्टे नागपुरी गेट अमरावती शहर | शेख अमिर वल्द शेख कुदुस वय ३५ वर्ष रा यास्मीन नगर अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की नक्कल लेखी फिर्यादी आम्ही पोहेकॉ शिवनाथ मदनराव आंधळे पोस्ट नागुपरीगेट अमरावती शहर मी शासन तफ फिर्यादी देतो की आज दि १७/१०/२०२४ रोजी २१/०० वा ते दि १८/१०/२०२४ चे ०९/०० पावेतो पो स्ट नागपुरी गेट येथे डिबी पथकात डयुटीवर असताना आम्ह पोस्टे हदीत पेटोलीग करित असताना आम्हास पोलीस आयुक्तालय अमरावती शहर येथील स्पेशल स्कॉड चे पोलीस निरीक्षक श्री आसाराम चोरमुले साहेब यांनी फोन व्दार माहीती देवुन आम्हा स रहेमत नगर चमडा गोडावुन येथ बोलाविले असता आम्ही सोबत नापोकॉ आनंद ब न १३४३ नापोकॉ दिनेश ब न १३६१ पो कॉ दमरान ब न १७०१ असे तात्काळ रहेमत नगर चमडा गोडावुन येथे पोहोचुन पो नि चोरमुले सा यांना रिपोर्ट केला असता त्यांनी आम्हास माहीती दिली की त्यांना गुप्त बातमीदारा कडुन न म पंचाना रहेमतनगर येथे प्राचारण केले वरून त्यांना वरिल प्रमाणे माहीती दिली की त्यांनी सहमती दिल्याने वरून स्पेशल स्कॉड चे पोनि चोरमुले साहेब , पोहे कॉ छोटेलाल यादव ब न ३२३, पोहे कॉ मंगेश ब न ४३७ , नापोकॉ आशिष नवले ब न ३१, पोकॉ रणजित गांवडे ब न ४३८ , पोकॉ निवुत्ती काकड ब न ४१६, पोस्टे नागपुरी गेट येथील आम्ही पोहेकॉ ४९४, नापोकॉ १३४३,१३६१ पोकॉ १७०१ व नमुद पंच असे मिळालेला माहीती प्रमाणे लालखडी चौका कडे जावुन लालखडी चौक पासुन काही अंतरावर वाहन उभे करुन लपत छपत पटेल पान ठेला कडे गेलो असता सार्वजनिक ठिकाणी एक इसम हातात लोंखडी पात्याच्या कोयता हातात घेवुन फिरत असताना दिसला व वरून आम्ही व पंचा नि खात्री केल्यानं तर उपस्थीत पोस्टाफ च्या मदतीने सर्वानी शितीफितीने साफळा रचुन हातात शस्त्र घेवुन फिरणाया इसमा वर पंचा समक्ष जागीच पकडले व त्याच्या हातातील लोखडी पात्याचा कोयता शस्त्र ताब्यात घेवुन त्यास नाव गाव विचारले असता त्यानी त्याचे नाव शेख अमिर वल्द शेख कुदुस वय ३५ वर्ष रा यास्मीन नगर अमरावती असे सांगितले वरू ताब्यातील जप्त करण्यात आलेला लोंखडी पात्याचा कोयता चे पंचा समक्ष मोजमाप केले असता सदर कोयता लोंखडी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | असुन सदर कोयत्या चे पात्याची लांबी २० इंच ,पात्याची मध्यभगाी रूंदी ०२ इंच असे असुन मुठ सुध्दा लोखंडी असुन सदर कोयत्याच मुठे ची लांबी ०७ इंच असुन एकुण लांबी २७ इंच किंमत १५० रू चा माल मिळुन आला सदर चा गुन्हा दाखल |
| १ | पो.स्टे. राजापेठ अप क्र. ५९१/२४ कलम ७(A),१२ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम १९८८ | म.रा.वि.वि. कं. कार्यालय MIDC उपविभाग - ३ अमरावती | दि. १४/१०/२४ चे १३.२९ वा . ते १४.१३ वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ<br><br>दि. १८/१०/२४ चे ००-३४ वा . | हबीब रशिद चौधरी वय ३२ वर्ष शिक्षण BE (इलेक्ट्रीकल) रा. फ्रेजरपुरा जुना बायपास रोड अमरावती | १)मुकेश बबनरावजी भोयर वय ४०वर्ष पद कनिष्ट अभियंता उपविभाग ४, म.रा.वि.वि.कं. मर्या. अमरावती रा. साईनिर्माण अपार्टमेन्ट फ्लॅट नं. १०६, आशियाड कॉलनी अमरावती<br><br>२)श्री दयाळ प्रकाशराव गजघने वय ३४ वर्ष रा. मुदलीयर नगर मोती नगर जवळ यशोदानगर रोड अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील घटना ता. वेळी व ठिकाणी तक्रारदार फिर्यादी यांनी ११/१०/२०२४ रोजी ला.लु.प्र.विभाग अम. येथे येवुन लेखी तक्रार दिली की, त्यांच्या स्वताच्या नावावर चौधरी सोलार सर्व्हिसेस या नावाने फर्म रजीस्टर आहे . या फर्म च्या माध्यमातुन ते घरोघरी सोलर बसविण्याचे काम करतात. मागील महिन्यात अध्यक्ष छोटी मस्जित मोमीनपुरा नवी वस्ती बडनेरा येथे सोलार पॅनल बसवायचा त्यांना ठेका मिळाला होता. सदरचे काम नियमानुसार पुर्ण करून दि. ०७/१०/२०२४ रोजी म.रा.वि.वि. कं. कार्यालय MIDC उपविभाग - ३ अमरावती येथे मीटर रिलीज करण्याकरीता अर्ज केला होता. त्यावरून दि. ११/०१०/२०२४ रोजी आरोपी क्र. १ व २ हे बडनेरा येथील मस्जित चे सोलर इन्स्पेक्शन करीता आले होते. इन्स्पेक्शन झाल्यानंतर दयाळ यांनी भोयर सा. यांचे समोर फिर्यादीस तुमचे मीटर रिलीज करण्याकरीता १०,००० रू. द्यावे लागतील अशी पैशाची मागणी केली . आलोसे क्र. ०१ कनिष्ठ अभियंता भोयर व खाजगी कर्मचारी दयाळ हे फिर्यादी यांना १०,००० रू. मोबदला म्हणुन पैशाची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली होती. तक्रारीच्या अनुशंगाने दि. १४/१०/२०२४ रोजी पो.नि. मांजरे यांनी सापळा पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी व पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान खाजगी कर्मचारी दयाळ यांनी फिर्यादी यांना मीटर रिलीज करण्यासाठी तडजोडीअंती ६००० रू. लाचेची मागणी श्री भोयर सा. यांच्या समक्ष केली. आरोपी यांनी तक्रारदार यांना मस्जितचे काम असल्याने या कामाचे पैसे राहु दया, असे म्हणुन आरोपी यांनी लाज स्विकारली नाही. वरून आरोपी क्र. ०२ यांना माझेवर संशय आल्यामुळे माझेकडुन पैसे घेतले नाही. भविष्यात दयाळ साहेब माझेकडुन पैसे घेणार नाहीत. अशी मला खात्री झाली. दि. १७/१०/२०२४ रोजी केलेल्या कार्यवाही दरम्यान व पडताळणी दरम्यान केलेल्या कार्यवाही अंती अशा दिलेल्या फिर्यादी च्या फिर्याद वरून आरोपीविरूध्द सदरची कार्यवाही कलम ७(A),१२ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम १९८८ करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा दाखल |